# प्रेसनोट

## " संरक्षण शिबीराचे समारोपन"

जा.क्र. ५४१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०७/२०१७

भंडारा :— आज दिनांक २५/०७/२०१७ ते २९/०७/२०१७ पर्यंत पोलीस बहुद्देशीय सभागृह, भंडारा येथे महाराष्ट्र राज्य महिला आयोग व पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे समारोपन करण्यात आले, सदर कार्यक्रमाला उपस्थीत पाहुणे थोरात सर शिक्षण अधिकारी अध्यक्ष ,मनिषा आंबेडारे परिवीक्षा अधिकारी महिला व बाल विकास मंडळ, देशमुख सर बाल संरक्षण अधिकारी, अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर वैशाली केळकर जिल्हा समन्वयक महाराष्ट्र राज्य महीला आयोग, हे समारोपीय कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी समारोपन कार्यकमामध्ये बावीस शाळेच्या विद्यार्थीचा सहावेश होता. सर्व मुलींना पाच दिवसात पुष्कळ शिकण्यासारखे होते, त्यांनी कसे वागायचे, हसत खेळत जगायचे सर्वानी जगायचे स्वत:चे रक्षण करता यायला पाहीजे. त्यांना कार्यक्रमा दरम्यान कराटे, पथनाटया व्दारे तसेच डॉक्टरनी प्रोजेक्टर वरुन माहिती दिली. मुलींना समाजामध्ये कश्याप्रकारे वागणुक दिली पाहीजे. मुलीची छेडखानी केल्यास कश्याप्रकारे समोर जावे, केणत्याही गोष्टीला भावुक होवु नये. कोणत्याही गोष्टीला कसे समोर जावे याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी कार्यक्रमा दरम्यान शालेय विद्यार्थीनींना ५ दिवशीय संरक्षण शिबीरामध्ये जे शिकले त्याचा पुढील आयुष्यात उपयोग घ्यावा. त्याचप्रमाणे कायदयाचे ज्ञान देण्यात आले. बालविवाह, सतीप्रथा बंद कायदा, बालकामगार कायदा इ. कार्यक्रमाचा उपक्रम शाळेमध्ये जावुन असा उपक्रम राबवुन झालेल्या प्रशिक्षणाबद्दल शाळेतील इतर मुलीनासुध्दा माहिती देण्यास कळविले. तसेच मा. थोरात सर शिक्षण अधीकारी यांच्या हस्ते प्रशस्ती पत्र देण्यात आले.

यावेळी समारोपन कार्यक्रमाचे सुत्र संचालन योगिनी नाकतोडे व आभार प्रर्दशन वैशाली केळकर यांनी केले.

पोलीस नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२३११५१८२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.